


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784







वर्ष ३ रे अंक : १८७ वा मंगळवार दि ०९ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयात बोगसगिरी ? बोगस अधिकारी, कंत्राटदार मजेत!

## सर्वसामान्य रुग्णांचे हाल!

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा सामान्य रुग्णालयातील कोव्हिडं १९ काळात कोट्यावधींचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर येऊनही आता काम न करता परत काही बोगस ठेकेदारांनी कंत्राट घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परिणामी येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात सर्वसामान्य व गोरगरीब रुग्णांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाने गेल्या (तीन ते चार) वर्षापासून काही सर्वसामान्य रुग्णांनाची हेळसांड चालवली आहे. नियमबाह्य डेपोटेशनवर कुंडली मारून खुर्चीवर बसलेल्या काही अधिकाऱ्यांनी तर कळस केलाय.गैरकारभार करून बोगस अधिकारी, कंत्राटदार मजेत दिसताहेत. एकीकडे एन.एल.हेल्थ केअर सोलापूरच्या ज्या कंपनीला करोडो रुपयांचे मॉड्यूलर ऑपरेशन थिएटरचे काम करण्याचे कंत्राट दिलेले होते, त्या कंपनीने काम पूर्ण न करताही त्याला ८० टक्के रक्कम अदा करण्याचा प्रताप येथील तत्कालीन अधिकाऱ्यांनी केला होता. परंतु त्याहून कळस म्हणजे अशा भ्रष्ट कंपनीला पुन्हा एकदा कंत्राट देण्याचा आल्याचा धक्कादायक प्रकार जिल्हा सामान्य रुग्णालयात घडला आहे. यावरून जिल्हा रुग्णालयात कार्यरत काही अधिकारी किती प्रतापविर असतील, याचा प्रत्यय येतो. यापूर्वीच्या तत्कालीन जिल्हाशल्यचिकित्सकांनी पोट फुटेस्तोवर भ्रष्टाचार केलेला आहे,*परंतु नवनियुक्त कर्तव्यदक्ष जिल्हा शल्यचिकित्सक बिराजदार यांनी भ्रष्टाचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा आज अनेक जण व्यक्त करीत आहेत. येथील जिल्हा रुग्णालयाचे कामकाज आणखी चांगले होण्यासाठी व नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळण्यासाठी अत्याधुनिक अशा मॉड्यूलर ओटीचे २३ कोटी रुपयांचे काम प्रशासनाने काढले होते. या कामासाठी सर्व नियमधाब्यावर बसवून निविदा काढून आर्थिक ठराव घेऊन मर्जीतल्या एन.एल.हेल्थ केअर सोलापूरच्या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले. कंपनीने सुरवातीला काही जुजबी पद्धतीने कामकाज केले नंतर हे कामकाज पूर्णपणे बंद करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून आजही ही मॉड्यूलर ओटी अक्षरशः भंगार अवस्थेमध्ये आहे. खरे तर अशाप्रकारे अर्धवट काम करणाऱ्या कंपनीवर लवकरात लवकर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची गरज असताना जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नितीन तडस यांनी कंपनीला चक्क या कामाचे सुरवातीलाच ८० टक्के बिल अदा करून टाकले. खरे तर तडस यांच्या अत्यंत निर्लज्ज अशा कारभाराचा हा नमुना आहे. काम पूर्ण झाल्याचे कोणतेही पुरावे नसताना कंपनीला ८० टक्के रक्कम अदा केली गेल्यामुळे या प्रकरणी डॉ.नितीन तडस व वादग्रस्त भांडारपाल प्रकाश बोथे राहणार हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परिसर अकोला व कंपनीमध्ये नक्कीच मोठी देवाणघेवाण झाल्याचे विभागीय चौकशीत सिद्ध पण झाले जिल्हा सामान्य रुग्णालयातील आज ही मॉड्यूलर ओटी अक्षरशः भंगार अवस्थेत असल्यामुळे त्याद्वारे कुठल्याही प्रकारची आरोग्य सुविधा ही सर्वसामान्य नागरिकांना मिळत नाही. कोव्हिडं १९ काळात तात्काळ दिलेल्या मुदतीत ही मॉड्युलर ओटी कार्यान्वित झाली असती तर आज पर्यंत शेकडो रुग्णांचे प्राण वाचले असते तरी आरोग्य विभागातील अधिकारी व आरोग्यमंत्री नामदार प्रकाश आबीडकर यांनी या प्रकरणातील विभागीय चौकशी समितीतीचा अहवालासह सर्व पुरावे तपासावे व दोषींकडून भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुप्यातून खरेदी केलेली चल अचल संपत्ती लिलाव करून येणारा सर्व पैसा शासन तिजोरीत जमा करावा अशी मागणी सुज्ञ नागरिक करीत आहे. विशेष म्हणजे गेल्या काही वर्षांमध्ये या ठिकाणी बरेच प्रभारी किंवा पूर्णवेळ जिल्हा शल्यचिकित्सक आलेत. परंतु प्रत्येकाने आपल्या अत्यत निर्लज्जपणाचा व नालायक कारभाराच नमुना सादर केलेला आहे.कारण अर्धवट काम करणाऱ्या कंपनीवर आजवर आलेल्या एकाही जिल्हा





शल्यचिकित्सकाने या प्रकरणी योग्य ती कायदेशीर कारवाई केलेली नाही. दुसरीकडे तडस यांच्यासह तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पंडित, डॉ.सुभाष चव्हाण यांच्या कार्यकाळात शैक्षणिक पात्रता नसलेला भांडारपाल प्रकाश बोथे यांच्याशी संगनमत करून साहित्य व औषधी उपकरणांच्या खरेदीत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. यामध्येही आजवर प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण रोड परिसर अकोला यांच्यावर बरखास्तीची अगदीच तोंडदेखली कारवाई करण्याव्यतिरिक्त काहीही झालेले नाही. जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला हा भ्रष्टाचार खरे तर राज्याच्या विधानसभेपर्यंत दोन वेळा पोहोचुन ही कारवाई फक्त राजकीय आश्वसनापुरतीच होती.परंतु बोगसगिरी कधी थांबणार? हा प्रश्न जनता विचारत आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# आधी तिने धुमाकूळ घातला शेतकऱ्यांना भयभीत केले मग वन विभागाने तिला पिल्लासह रेस्क्यू केले!

**जनसंचलन/बुलढाणा**

एका महिन्या पासून शेतशिवारात आपल्या एका पिलासह वावरणाऱ्या अस्वलामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.या अस्वल व तिच्या पिल्लाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी वारंवार गावकऱ्यांकडून होत असल्याने बुलढाणा वनविभागाच्या रेस्क्यू पथकाने दहिगाव परिसरात मादी अस्वल व तिच्या पिल्लाला रेस्क्यू करून आंबाबरवा अभयारण्यात सुखरूप सोडल्याची माहिती बुलढाणा आरएफओ सुनील वाकोडे यांनी ८ सप्टेंबर रोजी दिली आहे. बुलढाणा वनपरिक्षेत्र अंतर्गतच्या दहीगांव, करणखेड,मातमखेड परिसरात मागील एका महिन्यापासून एक मादी अस्वल आपल्या पिलासह शेतशिवारात फिरत असल्याने शेतकरी व शेत मजुरांमध्ये भीतीचे वातावरण होते.ते शेतात जाण्यासाठी घाबरत होते. त्यामुळे सदर गावांच्या सरपंचांनी बुलढाणा वनविभागाला माहिती देऊन या अस्वलाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली. बुलढाणा डीएफओ सरोज गवस यांनी अस्वलाला रेस्क्यू करण्याचे आदेश दिले असता एसीएफ वैभव काकडे आणि बुलढाणा आरएफओ सुनील वाकोडे यांनी रेस्क्यू पथकातील सदस्य शुटर संदीप मडावी,अमोल चव्हाण,पवन वाघ,पवन मुळे,प्रमोद गवई,राणी जोगदंड आणि प्रमोद सावळे यांना दहीगांव परिसरात ६ सप्टेंबर रोजी रवाना केले. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास सदर अस्वल पिल्लासह आंब्याच्या झाडावर चढल्याचे दिसून आले. मादी अस्वलाला डॉट मारून बेशुद्ध करण्यात आले तर तिच्या पिल्लाला फिजिकल रेस्क्यू करण्यात आले. मादी अस्वल झाडावरच बेशुद्ध झाल्याने तिला दोरी बांधून खाली उतरवण्यात आले. मादी अस्वल व पिल्लाला पिंजऱ्यात टाकून बुलढाणा येथील राणी बागेत आणण्यात आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार काल ७ सप्टेंबर रोजी या दोन्ही



अस्वलांना बुलढाणा जिल्ह्यातील अंबाबरवा अभयारण्यात सुखरूप सोडण्यात आले आहे.

# ...हालअपेष्टांवर गारेगार फुंकर...

## संपादकीय लेख

मुंबईच्या उपनगरी रेल्वेमार्गावर २३८ वातानुकूलित लोकलगाड्या, तसेच बदलापूर-कर्जत, आसनगाव-कसारा, पनवेल-वसई आणि पुणे-लोणावळा या मार्गांवर अतिरिक्त लोहमार्ग टाकणे यांसाठी राज्य सरकारने सुमारे २५ हजार कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे. वातानुकूलित रेल्वेगाड्या ताफ्यात दाखल होण्यास दोन वर्षांहून अधिक काळ लागेल. मध्य आणि पश्चिम रेल्वेवर गेल्या अनेक महिन्यांत नव्याने वातानुकूलित रेल्वेगाड्या दाखल झाल्या नसल्याने वातानुकूलित गाड्यांच्या फेऱ्या रद्द होण्याचे प्रमाण वाढले आहे. उपनगरी मार्गांवर त्याच भाड्यामध्ये वातानुकूलित गाड्या देऊ, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यंतरी दिले आहे. व्यावहारिकदृष्ट्या व रेल्वे बोर्डाच्या नियमावलीत ते बसणार का, हे अजून स्पष्ट व्हायचे आहे. लोकांच्या दररोजच्या प्रवासातील अधिकच्या भाड्याचा भार राज्य सरकार उचलणार असेल, तर त्याचे स्वागतच होईल. कारण शेवटी हा कष्टकरी प्रवासी वर्ग राज्याचा गाडा सुरळीत हाकला जावा, यासाठीच चाकावरच्या यातना सोसून प्रवास करीत असतो. एरवी मेट्रो रेल्वे किंवा मोटारींसाठी उभारलेल्या पुलांसाठी, भुयारी मार्गांसाठी सरकारने हजारो कोटी रुपये खर्च केले आहेतच. तेव्हा अधिकच्या संख्येने वापरल्या जाणाऱ्या उपनगरी रेल्वेच्या सुखकर प्रवासावर सरकारी तिजोरीतून खर्च करायला हरकत नाही. त्याच वेळी सध्याचे उपनगरी रेल्वेचे भाडे बरेच कमी आहे व राजकीय हेतूने त्यात अनेक वर्षे वाढ झालेली नाही. त्याचे थोडेफार सुसूत्रीकरण करता येऊ शकते. मात्र, लोकल ही काखोटीला बॅग लावून येणाऱ्या प्रवाशांप्रमाणेच फुले, भाजी, मासळी किंवा इतर चीजवस्तूंची मालवाहतूक करण्याकरिता कष्टकरी विक्रेत्यांकडूनही वापरली जाते, याचेही भान ठेवावे लागेल. बदलापूर, कर्जत, कसारा, पनवेल, वसई




त्याचप्रमाणे पुणे-लोणावळा अशा दूरदूरच्या मार्गांवर आता उपनगरी प्रवाशांची वर्दळ वाढलेली आहे. अधिकचे मार्ग उभारून तेथील प्रवाशांना दिलासा देणे आवश्यक आहे. नव्या जलद गाड्या आल्या, तर त्यासाठी सध्याचे लोहमार्गाही सक्षम हवेत. लोहमार्गांचा विस्तार आणि सक्षमता यासाठी रेल्वे प्रशासन आणि राज्य सरकारने जलदगतीने कार्यरत होणे आवश्यक आहे.तिथे स्थानिक लोकप्रतिनिधींनी रस घेऊन या योजनांचा पाठपुरावा करायला हवा. केवळ अनधिकृत बांधकामे वाचविण्यासाठी नव्हे, तर लोकलच्या अधिकृत प्रवाशांचीही बाजू घेऊन कधीतरी त्यांनी रस्त्यावर उतरावे.

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**जनसंचलन/मेहकर**

राहत्या घरात दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन युवकाने आत्महत्या केल्याची घटना रविवार, दि. ७सप्टेंबर रोजी पारडा येथे घडली. मृत तरुणाचे नाव पंडित कळणू क्षीरसागर (३५) असे आहे. पारडा येथे पंडित क्षीरसागर हे आई, पत्नी व दोन मुले (वय १२ व १० वर्षे) यांच्यासोबत वास्तव्यास होते. घरात शेती नसल्याने ते मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत होते. त्यांना घरकूल योजना मंजूर झाली होती, व त्यानुसार घरकुलाचे बांधकाम सुरू होते. यासाठी त्यांनी काही खासगी पतसंस्था व मायक्रो फायनान्सकडून आर्थिक मदत घेतली होती; मात्र आर्थिक विवंचनेमुळे पत्नी माहेरी सुलतानपूर येथे गेली असताना, पंडित क्षीरसागर यांनी शनिवारी रात्री जुन्या राहत्या घरात दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. रविवारी सकाळी ते उठले नाहीत म्हणून कुटुंबीयांनी हाक मारली; मात्र प्रतिसाद न मिळाल्याने घराचा दरवाजा तोडण्यात आला असता, ते गळफास घेतलेल्या अवस्थेत मृत आढळले.




# मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्यास महात्मा फुले समता परिषदेचा तीव्र विरोध!

## तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद तालुका देऊळगाव राजा यांच्यावतीने ओबीसी आरक्षणास बाधा आणणाऱ्या शासन निर्णयाबाबत तीव्र विरोध करत हा अध्यादेश त्वरीत रद्द करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देऊळगाव राजा तहसीलदार वैशाली डोंगरजाळ मार्फत देण्यात आले. या निवेदनात त्यांनी नमूद आले आहे की,घटनात्मक उलघन अनुच्छेद १५ (४) व १६ (४) प्रमाणे आरक्षण हे फक्त सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांना देता येते.मराठा समाजाचा समावेश हा या तत्वचा भंग आहे. हा शासन निर्णय पूर्णपणे अन्यायकारक, बेकायदेशीर व असंवैधानिक आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजातील सुमारे ४०० हुन अधिक जातींच्या हक्कावर गदा येणार असून त्यांना शिक्षण व नोकरीच्या होणारे प्रतिनिधित्व गंभीर स्वरूपात घटणार आहे.ओबीसी आरक्षणामध्ये कोणत्याही समाजाचा




अन्यायकारक समावेश होऊ नये. यावेळी समता परिषदेचे तालुका अध्यक्ष सदाशिव मुंढे, धर्मराज हनुमंते ,राजू खांडेभराड, दिलीप शेजुळकर ,संतोष पुजारी, अरविंद खांडेभराड, विष्णू झोरे ,विलास माळोदे,असगर भाईशहा, प्रकाश खांडेभराड, संजय तिडके ,बळीराम मापारी ,गोविंदभाऊ बोरकर,अहिरे सर,अनिल खांडेभराड, ,हरिभाऊ मोहिते,प्रदीप वाघ, संदेश वाघ, सुदर्शन गीते, बबलू जायभाये ,राजू नाडे,गजानन दंडे, नारायण लोखंडे, गणेश खांडेभराड,शिवानंद झोरे, दिलीप मोहिते , नागरे साहेब ,विजय खांडेभराड, कांता खांडेभराड, निलेश गीते, विजय झोरे, अनिकेत खांडेभराड, सचिन मुंडे ,अनिल वाघ ,उमेश म्हस्के, आकाश बोराटे, कौशल पगार, राम वाघमारे, शुभम भाग्यवंत ,मंगेश शेळके तेजस मुंडे, शुभम कायंदे, अक्षय ठाकरे ,ज्ञानेश्वर तिडके, गौरव मोहिते, विठ्ठल निंबाळकर, ऋषिकेश शेजुळकर संकेत पिंपळे, विजय झोरे, देवानंद हिवाळे यांच्यासह असंख्य ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लालबागचा राजा मंडळाविरोधात थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार, मच्छिमार कृती समिती आक्रमक...

**मुंबई :** लालबागचा राजा सार्वजनिक गणेश मंडळ विरोधात तक्रार करण्यात आली आहे. मच्छिमार कृती समितीकडून ही तक्रार करण्यात आली आहे. विसर्जन प्रक्रियेवेळी झालेल्या गोंधळामुळे लालबागच्या राजाचं विसर्जन चंद्रग्रहणाच्या काळात झालं. यामुळे लाखो गणेश भक्तांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत, असा आरोप मच्छिमार कृती समितीने केला आहे. तसेच लालबागला दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचा मानसिक आणि शारीरिक छळ होत असल्याचा देखील आरोप समितीने केला आहे. अखिल महाराष्ट्र मच्छिमार



कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांनी ई-मेलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवलं आहे. त्यांनी या पत्रात लालबागच्या मंडळाच्या कार्यकारी मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. लालबागच्या राजाच्या विसर्जनाचा प्रसंग काल आपण सर्वांनी पाहिला. त्या विसर्जनाच्या प्रक्रियेत जो काही घोळ झाला आहे, त्या विरोधात आम्ही आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे लेखी तक्रार केली आहे. या तक्रारीत हा जो घोळ झाला आहे, त्याची शहानिशा आणि चौकशी करण्याची विनंती केली आहेङ्कङ्क, अशी माहिती देवेंद्र तांडेल यांनी दिली.मूळ कारण असं आहे की, लालबागचा राजा मंडळाने हिंदू धर्मीयांच्या भावना दुखावल्या आहेत. कारण लालबागच्या राजाचं विसर्जन चंद्रग्रहणाच्या काळात केलं आहे. हे करताना त्यांनी कोळी बांधवांचं देखील मनं दुखावली आहेत. कारण आतापर्यंत कोळी बांधव नेहमीप्रमाणे लालबागच्या राजाचे विसर्जन करत आले आहेत. दुर्दैवाने या वर्षी त्यांना कोणताच मान देण्यात आलेला नाही. त्याचंच फलित विसर्जनाच्या दिवशी पाहायला मिळालंङ्कङ्क, अशी टीका देवेंद्र तांडेल यांनी केली.आमच्या तक्रारीत आम्ही हा मुद्दा उपस्थित करताना इतर मुद्देही घेतले आहेत. भाविकांना ज्या पद्धतीने वागणूक दिली जात आहे, आपण जे व्हिडीओ पाहत आलेलो आहोत ते पाहता कुठेतरी याचा अंतर झाला पाहिजे. व्हीआयपी कल्चर थांबलं पाहिजे. लालबागचा राजा हा सगळ्यांचा बाप्पा आहे. हा कुणी एका शेठचा गणपती नाही. त्यामुळे तातडीने यावर कारवाई झाली पाहिजे, उपाययोजना झाल्या पाहिजेत आणि एसओपी तयार झाल्या पाहिजेतङ्कङ्क, अशी मागणी देवेंद्र तांडेल यांनी केली.

# तारापूर औद्योगिक क्षेत्रात वायुगळती; ड्रग्स कंपनीतील घटना, धुराचे प्रचंड लोट, भीतीचे वातावरण

**पालघर :** पालघरमधील संवेदनशील अशा तारापूर औद्योगिक क्षेत्रातील एका कंपनीत वायू गळती झाली आहे. औद्योगिक क्षेत्रातील आरती ड्रग्स या कंपनीत वायुगळती झाली आहे. ज्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरले आहेत. घटनेमुळे कामगारांसह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. कंपनी प्रशासन यावर नियंत्रण मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. सुदैवाने कोणत्याही जीवितहानीचे अद्याप वृत्त नाही. पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट नंबर टी- १५० स्थित आरती ड्रग्स या कंपनीत अचानक वायू गळती झाली. वायुगळती झाल्यानंतर काही क्षणातच कंपनी व आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोण सर्वत्र पसरले. सोमवारी सायंकाळी सात वाजताच्या सुमारास ही घटना घडली आहे. कारखान्यात उत्पादन प्रक्रिया सुरू असताना हायड्रोक्लोरिक आम्ल बाहेर पडून हवेत पसरल्यामुळे ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. वायुगळती झालेली कंपनी औद्योगिक क्षेत्रातील सालवड शिवाजीनगर परिसरात



असून वायूगळतीमुळे कामगार व परिसरातील नागरिकांना डोळे चुरचुरणे घसा खवखवण्यासारखे त्रास जाणवू लागले. परिसरात धुराचे लोण पसरल्यामुळे भीतीपोटी अनेकांनी घरातून पळ पडल्याचे पहावयास मिळाले.घटनेची माहिती मिळाल्यानंतर बोईसर पोलीस व अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. वायुगळती सुरू झाल्यानंतर कंपनीच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी तात्काळ उपाययोजना केल्यामुळे वायू गळतीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून पुढील उपाययोजना सुरू आहेत.सोमवारी उरण मध्ये देखील संवेदनशील ओएनजीसी प्रकल्पात मोठी आग लागण्याची घटना घडली. दुपारी अडीचच्या सुमारास ही घटना घडली. दीड फुटाच्या पाईपमधून अचानक वायुगळती सुरू झाल्याने आग लागली. तत्काळ ओएनजीसी आणि सिडको अग्निशमन दलाच्या जवानांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केल्याने दोन ते अडीच तासांनी आग नियंत्रणात आली. घटनेमुळे काही काळ नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले होते. रणमधील सर्वात मोठे हे नैसर्गिक वायू आणि तेल शुद्धीकरण केंद्र असून, यार्केद्रातून नैसर्गिक वायू आणि तेल वितरण करण्यात येते. भारत सरकारकडून हा प्रकल्प संचालित असून वारंवार अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने प्रकल्पसंदर्भात अनेक प्रश्न या अनुषंगाने उपस्थित राहत आहेत.

# आशिया कपपूर्वी टीम इंडियासाठी गुड न्यूज, ऋषभ पंतच्या फिटनेसबाबत मोठी अपडेट...

**नवी दिल्ली :** आशिया कपला आता काही तासांतच सुरुवात होणार आहे. पण त्यापूर्वी आता भारतीय संघासाठी एक आनंदाची बातमी आली आहे. कारण आता ऋषभ पंतचं भारतीय संघात कमबॅक होणार असल्याचे समोर आले आहे. कारण पंतच्या फिटनेसबाबत एक महत्वाची गोष्ट आता समोर आली आहे. इंग्लंडच्या दौऱ्यात पंतने धडाकेबाज फटकेबाजी केली होती. पंत या दौऱ्यात भारतीय संघाचा उप कर्णधार होता आणि त्याने आपली जबाबदारी चांगली निभावली होती. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे पंतच्या पायाला फ्रॅक्चर झाले होते, तरीही तो फलंदाजी करण्यासाठी मैदाना उतरला होता. त्यामुळे त्याच्यावर जगभरातून कौतुकाचा वर्षाव झाला होता. पण या दुखापतीमुळे पंतला पाचवा आणि अखेरचा कसोटी सामना खेळता आला नव्हता. इंग्लंडमधील चौथ्या कसोटीनंतर पंत हा मैदानात दिसलाच नाही. पण आता पंतच्या दुखापतीबाबत एक मोठी अपडेट आता समोर आली आहे.पंतने काही दिवसांपूर्वी एक सोशल मीडियावर पोस्ट केली होती. त्यावेळी पंतच्या पायाला प्लास्टर नव्हते. पण त्यावेळी पंतच्या फिटनेसबाबत काहीच समोर आले नव्हते. पण आता पंतच्या पायाची चाचणी करण्यात आली आहे आणि त्याच्या फिटनेसबाबत एक मोठी गोष्ट समोर आली आहे. पंतच्या पायाची दुखापत ही आता बरी झाली आहे. त्यामुळे पंत लवकरच फिट ठरू शकतो आणि भारतीय संघात त्याने कमबॅक होऊ शकते. पण सावधगिरीचा उपाय म्हणून पंतला आशिया कप स्पर्धेत खेळवण्यात येणार नसल्याचे म्हटले जात आहे. कारण पंत हा पूर्णपणे आता बरा झालेला नाही. पण जर भारताचे यष्टीरक्षक जर आशिया कपमध्ये अपयशी ठरत असतील तर कदाचित त्याच्या नावाचा विचार केला जाऊ शकतो, पण त्याची शक्यता जास्त दिसत नाही. त्यामुळे पंत आता थेट वेस्ट इंडिजच्या कसोटी मालिकेत आपल्याला खेळताना पाहायला मिळू शकतो, असे म्हटले जात आहे.ऋषभ पंतच्या फिटनेसबाबत आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. त्यामुळे आता पंत आशिया कपमध्ये खेळू शकतो की नाही, ही गोष्टदेखील स्पष्ट झाली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नात्यातला ग्रीन फ्लॅग म्हणजे काय?



नातेसंबंधांमध्ये आपण अनेकदा इतरांचे चांगले गुण शोधतो. कोण निष्ठावान आहे, कोण बुद्धिमान आहे किंवा तो/ती आपल्याला आनंदी ठेवू शकतो की नाही. पण तुम्ही कधी स्वतःला विचारले आहे का की तुम्ही कोणासाठी ग्रीन फ्लॅग आहात की नाही? तुम्ही अशा प्रकारची व्यक्ती आहात का ज्याच्याशी कोणी खरे, खोल आणि प्रेमळ नाते जोडू शकेल? नातेसंबंध तज्ञांना असा विश्वास वाटतो की निरोगी आणि मजबूत नातेसंबंधाची सुरुवात स्वतःमध्ये डोकावून पाहण्यापासून होते. जेव्हा आपण स्वतःला समजून घेतो, आपल्या कमकुवत बाजू आणि क्षमतांना स्वीकारतो तेव्हाच आपण इतरांशी खरे नाते निर्माण करू शकतो. आज आपण पाहू या, चांगल्या नातेसंबंधाचे खरे लक्षण काय आहे आणि आपण नात्यासाठी तयार आहोत की नाही?

**जुन्या नात्यांतून काय शिकलो**

तुम्ही स्वतःला समजून घ्यायला सुरुवात केली असेल आणि तुमचे किंवा तुमच्या माजी प्रियकर/ प्रेयसीचे कोणते वर्तन नाते तुटण्यास जबाबदार होते हे तुम्हाला समजले असेल, तर तुम्ही पुढील नात्यासाठी तयार आहात.

**अडचणींपासून पळ काढत नाही**

आता तुम्हाला समजायला लागले असेल की कोणत्या गोष्टी किंवा परिस्थिती तुम्हाला त्रास देऊ शकतात, तर तुम्ही इतरांवर राग काढण्यापूर्वी स्वतःवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करता.

**अवघड बोलणं करायला घाबरत नाही**

तुम्ही कठीण संभाषणे करण्यास कचरत नाही. जर तुम्हाला खूप राग आला तर तुम्ही स्वतःला थोडा वेळ द्या, पण संभाषण अपूर्ण सोडू नका.

**खोटे मुखवटे लावत नाही**

या सर्वाव्यतिरिक्त, तुम्ही स्वतःला जसे आहात तसेच स्वीकार करता. इतरांना खूश करण्यासाठी तुम्हाला आता स्वतःला बदलण्याची गरज वाटत नाही. त्यामुळे कुठल्याही खोट्या मुखवट्याविना तुम्ही वावरू शकता.

# शिल्पा शेट्टीचं १०० करोडचं घर, हत्ती, घोडे आणि प्राचीन वस्तूंनी सजवले व्हाईट थीमचं घर पाहिलंत का?

बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि उद्योगपती राज कुंद्रा यांचे मुंबईतील समुद्रकिनारी वसलेलं आलिशान घर सतत चर्चेत असतं. तब्बल १०० कोटी रुपये किंमतीच्या या घराचं खास वैशिष्ट्य म्हणजे त्याची व्हाईट थीम आणि लक्झरीयस डेकोर. घरात शाहीपणाची झलक देणारे हत्ती, घोडे आणि प्राचीन वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे या घराचं सौंदर्य आणखीनच खुलून दिसतं.या घरात पांढऱ्या रंगाला प्राधान्य दिलं असून, भिंतींवर न्यूट्रल शेड्स, सोफ्ट लाईटिंग आणि कस्टम आर्टवर्क वापरले गेले आहेत. भव्य आरसे, सोन्याचे ॲक्सेंट्स, तसेच मोठ्या विंडोजमुळे नैसर्गिक प्रकाश घरात येतो. त्यामुळे घर अधिक प्रशस्त आणि आलिशान वाटतं. शिल्पाच्या घरात वेगवेगळ्या कोपऱ्यांमध्ये ठेवलेले ॲंटीक शोपीस, वूडन क्राफ्ट्स आणि हाताने कोरलेली कलाकृती यामुळे घराला वेगळं व्यक्तिमत्त्व मिळालं आहे. घराच्या एंट्रन्स हॉलमध्ये लावलेले मोठे आरसे आणि आकर्षक पेंटिंग्ज पाहुण्यांचं लगेच लक्ष वेधून घेतात. तर लिव्हिंग एरियात पांढऱ्या-करड्या रंगाच्या सोफ्यासोबत गोल्डन कुशन आणि क्रिस्टल लाईटिंग घराला राजेशाही टच देतात. किचनपासून ते डाइनिंग एरियापर्यंत सर्वत्र मिनिमलिस्टिक डिझाईन ठेवण्यात आलं आहे. इनडोअर गार्डन आणि ग्रीन प्लांट्समुळे घरात नैसर्गिकता टिकवली आहे. यामुळे पांढऱ्या रंगाच्या थीमसोबत ताजेपणाही टिकून राहतो. या आलिशात घरात पांढऱ्या रंगाला प्राधान्य दिलं असून, भिंतींवर न्यूट्रल शेड्स, सोफ्ट लाईटिंग आणि कस्टम आर्टवर्क वापरले गेले आहेत. भव्य आरसे, सोन्याचे ॲक्सेंट्स, तसेच मोठ्या विंडोजमुळे नैसर्गिक प्रकाश घरात येतो. त्यामुळे घर अधिक प्रशस्त आणि आलिशान वाटतं. शिल्पा शेट्टीच्या घरातून प्रेरणा घेऊन तुम्हीही तुमच्या घराच्या भिंती सजवू शकता. त्यासाठी काही आयडिया.




भिंतीवर मोठं पेंटिंग किंवा वूडन क्राफ्ट पीस लावल्याने घरात एक वेगळाच व्यक्तिमत्त्व येतो. वूडन कार्व्हिंग आर्टवर्क क्लासिक आणि उबदार लुक देतं, तर मेटल आर्टवर्क मॉडर्न आणि स्टायलिश टच आणतं. मोठ्या भिंतींसाठी गोल किंवा ॲब्स्ट्रॅक्ट मेटल आर्ट खूपच आकर्षक दिसतं. तुम्ही वूडन पॅनल्स, मेटल मिरर फ्रेम्स किंवा निसर्गावर आधारित स्कल्प्चर भिंतीवर लावून घराला वेगळा आणि आलिशान लुक देऊ शकता.घर सजवण्यासाठी ॲंटीक आरसे हा एक क्लासिक पर्याय आहे. भिंतीवर मोठ्या आकाराचा गोल किंवा चौकोनी आरसा लावल्याने जागा मोठी आणि प्रकाशमान दिसते. विशेषतः सोन्याच्या किंवा कांस्य रंगाच्या जुना लुक असलेल्या फ्रेम्स घराला रॉयल टच देतात.

लिव्हिंग रूम, कॉरिडॉर किंवा एंट्रन्स एरियामध्ये ॲंटीक मिरर लावल्यास पाहुण्यांचं लगेच लक्ष वेधलं जातं.तसेच अनेक छोटे ॲंटीक आरसे एकत्र लावून वॉल गॅलरी तयार करता येते. जर घरात व्हाईट किंवा न्यूट्रल थीम असेल, तर गडद रंगाच्या फ्रेम्समुळे आरसा अधिक उठून दिसतो. शिवाय, मिररवर एचिंग केलेली डिझाईन किंवा हाताने कोरलेली लाकडी फ्रेम घराच्या सजावटीला एक वेगळं आणि समृद्ध व्यक्तिमत्त्व देते.

# बाळंतपणाच्या कळा सुरू होताना बाळ केव्हा खाली सरकते?

बाळाला गर्भाशयात योग्य जागा हवी असते जेणेकरून ते फॅलोपियन ट्यूबमधून बाहेर पडू शकेल. बाळाचा जन्म नेमका कधी होईल हे सांगणे अशक्य असले तरी, बाळ जेव्हा पेल्विसमध्ये जाते तेव्हा ते प्रसूती वेदनांचे लक्षण मानले जाते. आज आपण तज्ज्ञ डॉक्टरांच्या व्हिडिओच्या साह्याने बाळ केव्हा आणि कसे खाली सरकते याची माहिती घेऊ या.



**बाळ केव्हा खाली सरकते**

बाळ सहसा गरोदरपणाच्या ३४ व्या आणि ३६ व्या आठवड्याच्या दरम्यान घसरते. परंतु काही महिलांमध्ये, प्रसूती वेदना सुरू होण्याच्या काही क्षण आधी हे घडू शकते. हे विशेषतः पहिल्यांदाच गर्भवती असलेल्या महिलांमध्ये सामान्य आहे. ज्या महिला एकापेक्षा जास्त वेळा गर्भवती राहिल्या आहेत, त्यांच्या गर्भाशयात बाळे खाली सरकत नाहीत. जर तुम्हाला वाटत असेल की तुमचे बाळ जागेवरून घसरले आहे, तर एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या. बाळाची योग्य स्थिती जाणून घ्या जेणेकरून प्रसूतीदरम्यान कोणतीही अडचण येणार नाही.

**बाळाचे डोके खाली केव्हा सरकते याविषयी डॉक्टरांचे मार्गदर्शन**

**बाळ खाली सरकण्याची लक्षणं** : बाळ खाली सरकत असताना, तुम्हाला स्वतःमध्ये खालील बदल जाणवू शकतात:

अ. पोटात बदल - तुम्हाला तुमचे पोट पूर्वीपेक्षा जास्त खाली लटकलेले जाणवेल.

ब. श्वास घेणे सोपे होईल - बाळ जसजसे खाली सरकेल तसतसे तुम्हाला श्वास घेणे सोपे होईल.

क. ओटीपोटात दाब - बाळ खाली सरकत असल्याचे तुम्हाला जाणवताच, तुम्हाला ओटीपोटात दाब आणि वेदना जाणवू लागतील.

ड. योनीतून स्त्राव वाढेल - बाळ पूर्णपणे श्रोणिमध्ये हलते तेव्हा ते गर्भाशय ग्रीवावर दबाव आणू लागते. यामुळे तुमचा म्यूकस प्लग बाहेर येतो, जो गुलाबी आणि जेलीसारखा स्त्राव असतो.

**बाळ खाली येताना काय होते**

अ. वारंवार लघवी होणे - प्रसूतीदरम्यान, बाळाचे तोंड बाहेर पडताच, महिलेला वारंवार लघवी करण्याची गरज भासते.

ब. पाठदुखी - बाळ घसरल्याने, महिलेच्या पाठीच्या स्नायूंमध्ये वेदना वाढतात.

क. भूक वाढते - बाळ जसजसे खाली सरकू लागते तसतसे पोटात दाब आणि छातीत जळजळ कमी होते. त्यामुळे भूक वाढते.

ड. मूळव्याध - गर्भधारणेदरम्यान बाळाचे डोके महिलेच्या ओटीपोटावर दाब देते. हेच मूळव्याध होण्याचे कारण आहे.

प्रसूतीच्या वेळी बाळ खाली सरकलं नाही तर कधीकधी बाळंतपणाची तारीख जवळ आल्यानंतरही बाळ खाली सरकत नाही. याचा अर्थ असा नाही की तुम्ही काळजी करत ताण घ्यावा. काही टिप्स वापरून तुम्ही बाळाला खाली सरकण्यास मदत करू शकता.अ. गर्भाशय ग्रीवा उघडण्यासाठी योग्य व्यायाम करा.ब. या काळात पाय आडवे करून बसू नका. ही स्थिती बाळाला मागे ढकलते.क. पुढे झुकून बसा जेणेकरून बाळ श्रोणीकडे सरकेल.

**डॉक्टरांशी संपर्क**

एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या. बाळाची योग्य स्थिती जाणून घ्या; जेणेकरून प्रसूतीदरम्यान कोणतीही समस्या उद्भवू नये. सहसा गर्भाशयात बाळाची स्थिती बदलत राहते. परंतु जन्माच्या काही वेळापूर्वी बाळ खाली सरकते.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# प्रबोधनच करेल कुप्रथांवर मात



प्राचीन काळापासून चालत आलेल्या प्रथांचं, रूढी-परंपरांचं समाजात मोठ्या प्रमाणावर अंधानुकरण केलं जातं. त्यात अंधश्रद्धेपोटी निर्माण होणा-या भीतीचा भागही महत्त्वाचा असतो. प्रगत शिक्षणाबरोबर सामाजिक प्रबोधनातूनच अंधश्रध्दा आणि त्यातून निर्माण होणा-या भीतीच्या पगडय़ावर मात करता येईल. आपण प्रगत तंत्रज्ञानाच्या, आधुनिक जगात वावरत आहोत. आपल्या देशानं प्रगत तंत्रज्ञानात घेतलेली झेप कौतुकास्पद आहे. शिक्षणाचा प्रचार-प्रसार मोठय़ा प्रमाणावर होत आहे. आधुनिक शिक्षणाकडील विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे. असं असलं तरी समाजात अंधश्रद्धेचा पगडा कायम असल्याचं पाहायला मिळतं. त्यामुळे श्रद्धा वाढतेय का भीती, या प्रश्नाचा विचार करताना अंधश्रद्धा का वाढतेय हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. खरं तर समाजात अंधश्रद्धेऐवजी श्रद्धा जास्त असती, तर चित्र बरंच वेगळं दिसलं असतं. मुख्यत्वे समाजातल्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीला काम करावं लागलं नसतं. नरेंद्र दाभोलकरांना आपला जीव गमवावा लागला नसता. बरं, अंधश्रद्धा प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. अशी ही श्रद्धा समाजात दिसणा-या भीतीतून निर्माण होते का गरसमजातून, हाही विचारात घेण्याजोगा भाग आहे. आज कितीही मोठं हॉस्पिटल असलं तरी त्यात एखादं मंदिर वा प्रार्थनागृह असतंच. तिथे त्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल असलेल्या ९० टक्के रुग्णांचे कुटुंबीय, नातलग दर्शनासाठी, प्रार्थनेसाठी आवर्जून जातात. आपल्या माणसाला आजारातून बरं करण्यासाठी हीच शक्ती कामी येईल, अशी या लोकांची धारणा असते. किंबहुना आजारात आपल्या रुग्णाच्या जीवाचं काही बरं-वाईट होतं की काय, या शंकेपोटी वा भीतीपोटीही देवदर्शन अथवा प्रार्थनेचा आधार घेतला जातो. इथे श्रद्धा आणि भीती या एकाच नाण्याच्या दोन बाजू दिसतात.

रुग्णांचे नातेवाईकच नव्हे तर उच्चशिक्षित, तज्ज्ञ डॉक्टर्सही गंभीर अवस्थेतल्या रुग्णांच्या नातेवाइकांना सांगत असतात की, आम्ही आमच्या परीने प्रयत्न करत आहोत. बाकी त्या परमेश्वराच्या हातात आहे. वैद्यकशास्त्राचं शिक्षण घेणारे उच्चशिक्षित डॉक्टर्स असं म्हणतात तेव्हा आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. खरं तर यातून संबंधित रुग्णांच्या नातेवाइकांच्या मनात एक प्रकारची भीती निर्माण होते, त्यांच्यावर ताण-तणाव वाढतो आणि मग डॉक्टर म्हणतात त्याप्रमाणे देवाला साकडं घालू, असं म्हणत मठ, मंदिरांमध्ये वा अन्य प्रार्थनास्थळांमध्ये धाव घेतली जाते. वास्तविक, प्रगत वैद्यकीय उपचारांचा उपयोग होत नाही तिथे अन्य कोणती शक्ती त्या रुग्णाला वाचवणार? केवळ प्रार्थना, उपासना या बळावर रुग्ण मृत्यूच्या दाढेतून बाहेर येऊ शकणार का? हे प्रश्न कोणी कोणाला विचारत नाही आणि त्याची चर्चाही होत नाही. मग ही भीतीपोटी निर्माण झालेली वा असलेली श्रद्धा असंच म्हणावं लागेल.

इथे एका घटनेचा उल्लेख करायला हवा. फिनाईल घेतल्यानं अत्यवस्थ असलेल्या एका मुलीला तातडीनं मोठय़ा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं. तिच्यावर उपचारही सुरू झाले. दरम्यान त्या मुलीच्या जवळच्या नातलगानं तिला बरं केल्यास बालाजीला माझे केस वाहीन, अशा स्वरूपाचा नवस केला. ही त्या देवाप्रती खरंच मनापासूनची श्रद्धा म्हणायची का? त्या मुलीच्या जिवाचं काही बरं-वाईट होईल, या भीतीपोटी तो नवस बोलण्यात आला. त्यामुळे मुलीच्या जीवावरचं संकट टळेल, असा नातलगांना विश्वास होता. आधुनिक उपचारतंत्राच्या जमान्यातलं हे चित्र समाज कुठं चाललाय, याचं द्योतक म्हणावं लागेल. अशी अनेक उदाहरणं, घटना आजूबाजूला सातत्यानं पाहायला मिळतात. मुळात ही अंध विश्वासातून येणारी भीती आहे. त्यामागे विशिष्ट कारणं आहेत, असं म्हणता येणार नाही. हे चित्र समाजशिक्षणाद्वारे बदलता येणार का, असा प्रश्न या निमित्तानं समोर येतो. आज समाजात शिक्षणाची कमतरता आहे, असं म्हणता येणार नाही. मात्र, शिक्षणाद्वारे समाजासमोर विविध बाबींचं वैज्ञानिक सत्य समजावून देण्याची, उघड करण्याची मोठय़ा प्रमाणावर आवश्यकता आहे. तसे प्रयत्न अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून केले जात आहेत. शिवाय ङ्गपीकेफ, ङ्गओ माय गॉडफ असे चित्रपटही समाजातल्या अंधश्रद्धा, अकारण भीती यावर नेमका प्रकाश टाकतात; परंतु आपल्याकडे चित्रपट हे केवळ मनोरंजनासाठी असतात, त्यातल्या बाबी ख-या धरायच्या नसतात, असा समज ब-याच प्रमाणात कायम आहे. त्यामुळे समाजाला नेमकी दिशा देणा-या अशा चित्रपटांचा प्रत्यक्षात म्हणावा तसा परिणाम दिसून येत नाही.

आपल्याकडे प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या प्रथांचं मोठय़ा प्रमाणावर अंधानुकरण केलं जातं. मात्र, त्या वेळची सामाजिक परिस्थिती, आताची सामाजिक परिस्थिती, त्या प्रथा वैज्ञानिक कसोटीवर कितपत उतरतात, यांचा विचार केला जात नाही. ही मानसिकता बदलण्याची खरी आवश्यकता आहे. ती केवळ शिक्षणाच्या प्रचार-प्रसारानं दूर होईल, असं म्हणणं धाडसाचं ठरेल. तसं असतं तर शिक्षणाचा प्रचार-प्रसार वाढत गेला, आधुनिक शिक्षणाचं वारं वाहू लागलं तसं पूर्वीच्या रूढी-परंपरांच्या अंधानुकरणाची मानसिकता ब-याच प्रमाणात कमी झाली असती; परंतु तसं चित्र दिसून येत नाही. मुळात भारतीय शिक्षणपद्धतीत चुकीच्या पद्धतीनं शिक्षण दिलं जातंय, असं मी म्हणेन. या शिक्षणात प्रामुख्यानं हिंदू धर्माच्या प्रार्थनांचा, कथांचा समावेश असतो. मग अन्य धर्माच्या प्रार्थना का शिकवल्या जात नाहीत, असा प्रश्न पडणं साहजिक आहे. खरं तर कोणत्याही धर्मापेक्षा अखिल मानवजातीच्या हिताची प्रार्थना अधिक महत्त्वाची ठरणार आहे. या सा-यात येणारी पिढी हाच आशेचा मुख्य किरण असणार आहे. हे लक्षात घेऊन प्रत्येक शाळा-महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण दिलं जाण्याची आवश्यकता आहे. श्रद्धा, अंधश्रद्धा, भीती या बाबींची उकल करून सांगितली जाणं गरजेचं आहे.

रामायणकाळात सीता रामासाठी सती गेली. ती मोठी पतिव्रता होती, तिनं पातिव्रत्यासाठी आगीत उडी घेतली. त्याच पद्धतीनं आताच्या मुलींनीही शुद्ध, पवित्र राहावं असा आग्रह पिढय़ान्पिढय़ा धरला जात आहे. त्यातूनच कौमार्य चाचणीची प्रथा सुरू झाली; परंतु रामायणकाळ कुठे, आताचा काळ कुठे, या काळात अशा प्रथा योग्य ठरतात का, याचा विचार केला जात नाही. ही सुद्धा परंपरेतून वा अंधश्रद्धेतून आलेली भीतीच म्हणावी लागेल. मुलींनी घरात राहावं. शिक्षण घेऊ नये, व्यभिचार करू नये, यासाठी कडक निर्बंध घातले जातात; परंतु मुलांनी व्यभिचार केला तर? विवाहापूर्वी तरुणानं कोणा तरुणीशी शरीरसंबंध ठेवले असतील तर? त्या दृष्टीने तो व्हर्जनि नसेल तर? हे कोण पाहणार? याचं उत्तर कोणी देत नाही. यात नववधू मात्र भरडल्या जातात. कौमार्य चाचणीची प्रथा बंद करावी, असं या समाजातल्या मुलींचं प्रामाणिक मत आहे; परंतु ते व्यक्त केलं तर काय होईल, याची भीती मुलींना आणि त्यांच्या पालकांना सतावत असते. या प्रथेचं पालन केलं नाही तर समाज काय म्हणेल, पंच काय म्हणतील, आपल्याला कोणती शिक्षा दिली जाईल, असे प्रश्न अस्वस्थ करतात. या भीतीपोटी कौमार्य चाचणीसारख्या अमानुष प्रथेला उघडपणे विरोध करण्याचं धाडस केलं जात नाही. मात्र, आता या प्रथेच्या विरोधात धाडसानं पाऊल टाकलं जात आहे, ही समाधानाची बाब म्हणायला हवी. मात्र, ही प्रथा लपूनछपून सुरू ठेवण्याचे प्रयत्न होत आहेत. ती बंद करण्याचं आव्हान कायम आहे. मात्र, सततच्या प्रयत्नांमधून, कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणीतून ही प्रथा कायमची हद्दपार होईल, असा मला विश्वास आहे. ही परिस्थिती लक्षात घेता समाजावरील अंधश्रद्धेचा आणि त्यातून निर्माण होणा-या भीतीचा पगडा दूर होण्याची आवश्यकता आहे. तसं झाल्यास भयमुक्त, विज्ञाननिष्ठ समाजाचं स्वप्न साकार होईल.

# मनाची शक्ती तुम्ही एकदा आजमावून बघा..



तुमचं वजन कमी करण्यासाठी मनाचीशक्तीआजमावून बघा.मी माझं वजन कमी करू इच्छिते, हे म्हणणं सोडून द्या. आपल्याला जे होऊ नये असं वाटत असतं, त्यावरच आपलं अवचेतन केंद्रित होतं. मी वजन कमी करू इच्छितो, असं जर तुम्ही सतत म्हणत राहिलात तर प्रत्यक्षात वजन वाढेल. त्याऐवजी अशा शब्दांचा वापर करा की, मी फिट आणि लवचिक होऊ इच्छितो, मी माझ्या आदर्श शरीराच्या वजनापर्यंत पोहचण्याची इच्छा करतो. काही शिनतशाली सल्ले तुम्ही उपयोगात आणू शकता...

१. मी माझ्या शरीराच्या आदर्श वजनासाठी खूश आणि आभारी आहे.

२. दररोज मी आदर्श वजनाच्या जवळ पोहचत आहे.

३. मला माझ्या शरीराविषयी अधिक छान वाटतंय.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मनोज जरांगे यांचा प्लॅन बी तयार, सरकारकडून दगाफटका झाल्यास काय करणार?

**बीड :** मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचं आज बीडच्या नारायण गड येथे जंगी स्वागत करण्यात आलं. यावेळी मनोज जरांगे यांनी भाषण केलं. मनोज जरांगे यांनी आपल्या भाषणात आपला प्लॅन बी देखील सांगितला. राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरनुसार जात प्रमाणपत्र देण्यास मंजुरी दिली आहे. पण तसं न झाल्यास काय करणार? याबाबत मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या समर्थकांना महत्त्वाची माहिती दिली आहे. राज्य सरकारने दिलेला शब्द पाळला नाही तर जरांगे यांचा प्लॅन बी तयार आहे. यावेळी जरांगे उपोषण करणार नसल्याचं म्हणाले आहेत. तर मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरु देणार नाही, असा इशारा जरांगे यांनी दिला आहे. तसेच ग्रामीण महाराष्ट्रातून शहरात जाणारा भाजीपाला, दूध बंद करु, असा देखील प्लॅन तयार असल्याचं



जरांगे यांनी स्पष्ट केलं. यामुळे सरकारसाठी हा मोठा इशारा आहे. आपण काळजी करु नका, मराठवाड्यातील सर्व मराठा समाज शंभर टक्के आरक्षणात जाणार आहे. मी काही नुसतं भाषण करत नाही. तुम्हाला सिद्ध करुन दाखवले. याआधीदेखील म्हणत होते की, मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षण देणार नाही. तुमच्या साक्षीने ३ कोटी मराठ्यांना आरक्षण दिलं की नाही? आता निघालेल्या जीआरमधून एक राहत नाही. आता काही जणं डोक्यातून काढून टाकायचं. त्यांना असं वाटतं की, आपण शेतात काम करतो म्हणजे आपल्याला डोकं नाही, असा त्यांचा गैरसमज आहे. तुला अक्कल होतं तर तू आतापर्यंत का आरक्षण मिळवून दिलं नाही?ङ्खङ्ख, असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला.आपली मुलं सुखी होतील यासाठी लढाई लढत राहायची. पण समाजाला मिळवून द्यायचं. आपण जे केलं ते वाया जावू दिलं नाही. तुम्हाला धोका कधी आहे? मी फुटल्यावर. मग तुम्ही शंका घ्या. आपल्याला फसवलं तर फसवणारं सरकार आहे. आपण आपल्यात एकमेकांना कुणी फसवणार नाही. मला वाटलं असतं तर मी माझंच कुटुंब मोठं केलं असतं. समाज मोठा करायचा आहे. त्यासाठी झुंज सुरु आहेङ्खङ्ख, असं मनोज जरांगे यांनी सांगितलं.आपली नोंदच नव्हती. आता हैदराबाद गॅझेटची नोंद घेणार आहेत. नाही घेतलं तर त्यांना महाराष्ट्रच बंद करुन टाकू. फिरुच द्यायचं नाही. आपण काम करताना पुन्हा लढायची वेळ आली तरी हरकत नाही. कधी माणसाची हार होते? समाजाच्या स्वाभिमानाचा विचार नाही केला आणि स्वत:चा विचार केला तर समाज खचतो. तुमचा स्वाभिमान कमी होऊ देणार नाही. तुमची प्रतिष्ठा कमी होऊ देणार नाही. जितका अपमान करतील तितक्या ताकदीने मी लढतो. मी माझ्या समाजाची खाली मान होऊ देत नाही. एखादी गोष्ट एक-दोन महिने उशिरा मिळेल पण स्वाभिमान गहाण ठेवायचा नाही. मी समजाला टप्प्याटप्प्याला मिळवून देईनङ्खङ्ख, असं आश्वासन मनोज जरांगे यांनी दिलं.कायदा या पोरांनी आणि मी बनवला. येवल्यावाला तर कुणाकडेही जीआर घेऊन फिरत आहे. याचा अर्थ काय? असं विचारत आहे. तज्ज्ञाकडे जीआर घेऊन जातो आणि मला काही समजत नसल्याचं म्हणतो. म्हणजे नुसत्या गरिबाच्या पोराने एक कायदा बनवला तर अर्धा महाराष्ट्र टेन्शनमध्ये आला. आम्ही चूक झाली तर आमचं दुरुस्त करु. आम्ही आमचं बघूङ्खङ्ख, असं जरांगे म्हणाले.

# गरिबांच्या भुकेचा आधार संकटात, शिवभोजन योजनेची आर्थिक कोंडी; केंद्र चालक उतरले रस्त्यावर

**नागपूर :** राज्यातील गरीब, गरजूंना आणि श्रमिक वर्गासाठी कमी दरात पौष्टिक जेवण उपलब्ध करून देणारी शिवभोजन योजना सध्या थकबाकीमुळे गंभीर संकटात सापडली आहे. नागपूर शहर व ग्रामीण भागातील केंद्रचालकांनी सात महिन्यांपासून थकीत असलेले बिल मिळावे, यासाठी सोमवारी संविधान चौकात धरणे आंदोलन केले.राज्य शासनाच्या १ जानेवारी २०२० च्या निर्णयानुसार सुरू झालेल्या या योजनेला गरीब कुटुंबांकडून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. नागपूर शहरात तब्बल १६४, तर ग्रामीण भागात ४६ केंद्रे कार्यरत असून राज्यभर जवळपास १९ हजार केंद्रांमधून दररोज हजारो लोकांना स्वस्तात भोजन मिळते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून केंद्र चालकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.केंद्रचालकांचे म्हणणे आहे की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात बिल वेळेवर मंजूर होत असे. मात्र, महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर थकबाकी रोखून ठेवली गेली असून त्यामागे जाणीवपूर्वक डाव असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सध्या वार्षिक फक्त २७० कोटी रुपयांचा खर्च असणाऱ्या या योजनेसाठी सरकारने यंदा केवळ ७० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे शासनाची भूमिका नकारात्मक असल्याचे स्पष्ट होत आहे, असा आरोप आंदोलकांनी केला.आर्थिक संकटामुळे अनेक केंद्रचालकांना दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले आहे. भाज्यांची खरेदी, भाडे, कामगारांचे वेतन, वीजबिल या खर्चासाठी त्यांना कर्ज काढावे लागत आहे. काही ठिकाणी तर केंद्र बंद पडण्याची वेळ आली आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, सरकारने तातडीने थकीत बिल न दिल्यास हजारो गरीबांना मिळणारे स्वस्त अन्न बंद पडेल आणि केंद्रचालक उपजीविकेपासून वंचित राहतील.शिवभोजन संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, आठ दिवसांत थकीत देयके न मिळाल्यास राज्यव्यापी आंदोलन उभारले जाईल. फक्त नागपूरच नव्हे तर प्रत्येक तालुक्यात, प्रत्येक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर निषेध नोंदवला जाईल. शिवाय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या घरासमोर, तसेच




पालकमंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर ङ्खङ्खढोल बजाव आंदोलनङ्खङ्ख करण्याचीही घोषणा करण्यात आली आहे.नागपूरमधील सोमवारी झालेल्या आंदोलनात शेकडो केंद्र चालक सहभागी झाले होते. शिवभोजन योजना सध्या थकबाकीमुळे मार्गावरून घसरली असली, तरी राज्यातील लाखो लाभार्थ्यांसाठी ही योजना जीवनरेखा मानली जाते. राज्यातील गरीब व श्रमिक वर्गासाठी फक्त १० रुपयांत गरमागरम जेवण मिळाल्याने अनेकांच्या पोटाची खळगी भरते. मात्र, सात महिन्यांपासून केंद्र चालकांचे बिल थकीत राहिल्याने योजनेवर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.

# स्पेक्स २०३० उपक्रमाद्वारे गडचिरोलीतील नागरिकांची होणार नेत्रसेवा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटनेचा उपक्रम

**वृत्तसंस्था/मुंबई**

गडचिरोलीसारख्या आदिवासी व मागास जिल्ह्यांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती व उपचार पोहोचविण्यासाठी तसेच तेथील नागरिकांना परवडणाऱ्या व गुणवत्तापूर्ण नेत्रसेवा उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात येत आहे. राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या ङ्खस्पेक्स २०३०ङ्ख या प्रकल्पामुळे मुलांचे शिक्षण, तरुणांसाठी रोजगार व संपूर्ण समाजाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणारा हा उपक्रम महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात राबविण्यात यावा, असे आवाहन केले. जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुका आता डोळ्यांसंदर्भातील आरोग्यसेवेच्या दृष्टीने देशभरात आदर्श ठरणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा ङ्गस्पेक्स २०३०- वन साईट कार्यक्रमफ राज्य सरकारच्या आरोग्य विभाग आणि वन साईट एसीलॉर लक्सोटिका फाऊंडेशन यांच्या सहकार्याने गडचिरोलीसह देशातील पाच मागास जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम राष्ट्रीय अंधत्व निवारण व दृष्टिदोष नियंत्रण कार्यक्रम () अंतर्गत राबविला जाणार आहे. जगभरात २.२ अब्ज लोकांना दृष्टीदोषाचा त्रास असून, त्यातील किमान १ अब्ज प्रकरणे टाळता येऊ शकतात. भारतात जवळपास ५३ टक्के दृष्टीदोष हे अपूर्ण दृष्टीदोष दुरुस्तीमुळे ( ) निर्माण होतात. यामध्ये प्रत्येक दहा शाळकरी मुलांपैकी एका मुलाला दृष्टीविषयक समस्या भेडसावते. या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेमार्फत ङ्खस्पेक्स २०३०फ ही योजना सुरू करण्यात आली असून २०३० पर्यंत सर्वसामान्यांना स्वस्त व दर्जेदार चष्म्यांचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेमार्फत गडचिरोलीसह आसाम (धुब्री), ओडिशा (कलाहांडी), राजस्थान (अलवर) आणि उत्तर प्रदेश (प्रयागराज) या राज्यांतील निवडक भागांमध्ये आशा




किरण मॉडेलफच्या आधारे सेवा राबवली जाणार आहे. या मॉडेलमध्ये आशा सेविकांमार्फत घराघरात प्राथमिक नेत्रतपासणी, प्राथमिक आरोग्य केंद्रांवर रेफ्रॅक्शन व चष्म्यांचे वितरण तसेच शासकीय रुग्णालयांत मोतीबिंदू शस्त्रक्रिया अशा सर्व टप्प्यांवर नेत्रआरोग्यसेवा पुरवली जाणार आहे. या कार्यक्रमांतर्गत स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व क्षमता वृद्धी, समुदायामध्ये जनजागृती मोहीम, शाळा व ग्रामपंचायत पातळीवर आरोग्यविषयक संवाद, स्थानिक स्वयंसेवी संस्था व माध्यमांद्वारे प्रचार-प्रसार तसेच कार्यक्षमता व परिणामकारकता मोजण्यासाठी डेटा संकलन व विश्लेषण अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

# जेसीबी व ट्रॅक्टर ची बॅटरी शेतातून चोरट्यांनी केली लंपास अज्ञान चोरट्यां विरुद्ध गुन्हा दाखल

## ग्रामीण भागात चोरांच्या टोळ्या सक्रिय; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**जनसंचलन/मलकापूर**



मलकापूर शहर मधील घिर्णी निवासी युवा व्यवसाय,बजरंगदल तालुका सह संयोजक अनंता तुकाराम बगाडे यांचे स्वतः च्या मालकीचे व ट्रक्टर दिनांक २६ ऑगस्ट रोजी रात्री दहा वाजता वावरातून अज्ञात चोरट्यांनी व ट्रॅक्टरची बॅटरी व साहित्य किट चोरिची घटना घडली. सविस्तर माहिती अशी की, घिर्णी येथील अनंता बगाडे , ट्रॅक्टर चालक मालक व्यवसाय करून कुटुंबाचे पालण पोषन करीत असतात दि. २६/०८/२०२५ रोजी रात्री १०.०० वा. दरम्यान त्यांच्या मोबाइल वर आलेला तो संदेश रात्री ०१.३० वा त्यांनी बघितला असता त्यांच्या वाहनाच्या कोणीतरी बॅटरी काढल्या असल्याचे समजले असता रात्री ०१.४० वा दरम्यान सदर ठिकाणी शेतात जावुन पाहील असता व ट्रक्टरला असलेल्या बॅट-या अनुक्रमे १३० व ९० च्या दिसुन आल्या नाही तसेच, स्टाफलीक पार्ट, जॉक पाटा या वस्तुअंदाजे ३०,०००/-रु च्या वस्तु अज्ञात चोरांनी चोरून नेल्या आहेत या घटनेची मलकापूर शहर पोलीस स्टेशन येथे येऊन अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाविषयी जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा

## १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत अभियान राबविण्यात येणार

**जनसंचलन/बुलढाणा**

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शासकीय योजनांच्या प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणीसाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाविषयी जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे सहकार विद्या मंदिर, बुलढाणा येथे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. ग्रामविकास विभाग व जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेस प्रमुख अतिथी म्हणून आमदार संजय गायकवाड, तर अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात हे होते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यशाळेमध्ये सुशासनयुक्त पंचायत सक्षम पंचायत, जलसमृद्ध स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण, गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे, नाविन्यपूर्ण उपक्रम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून अनंतकुमार नेमाने यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला जिल्हा परिषदचे विविध विभाग प्रमुख, सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, सर्व ग्रामपंचायत सरपंच, सर्व विस्तार अधिकारी व सर्व ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या नियोजनासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा) संजय इंगळे, सहाय्यक गटविकास अधिकारी सुरेश तायडे, विस्तार अधिकारी व्ही बी राऊत, ग्रामपंचायत अधिकारी गणेश जायभाये, सुमित भोपळे, जिल्हा व्यवस्थापक (आरजीएसए) कौतिक पाडळे व ग्रामपंचायत विभागातील इतर कर्मचारी यांनी नियोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी चंद्रशेखर जोशी यांनी केले.

१५ लाख ते पाच कोटींपर्यंतचे बक्षिस

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे दि. १७ सप्टेंबर ते दि. ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार असून या अभियानांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापनही केले जाणार आहे. या अभियानात सहभाग घेणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना बक्षिस दिले जाणार आहे.

ग्रामपंचायतींना चार स्तरांवर मिळणाऱ्या बक्षिसांचे स्वरूप

तालुकास्तर :- प्रथम पुरस्कार १५ लाख, द्वितीय पुरस्कार १२ लाख, तृतीय पुरस्कार ८ लाख व विशेष पुरस्कार ५ लाख रुपये

जिल्हास्तर :-प्रथम पुरस्कार ५० लाख, द्वितीय पुरस्कार ३० लाख, तृतीय पुरस्कार २० लाख रुपये

विभागस्तर :-प्रथम पुरस्कार १.० कोटी, द्वितीय पुरस्कार ८० लाख, तृतीय पुरस्कार ६० लाख रुपये

राज्यस्तर :-प्रथम पुरस्कार ५ कोटी, द्वितीय पुरस्कार ३ कोटी, तृतीय पुरस्कार २ कोटी रुपये

पंचायत समितींना मिळणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप :

विभागस्तर :-प्रथम पुरस्कार १ कोटी, द्वितीय पुरस्कार ७५ लाख, तृतीय पुरस्कार ६० लाख रुपये

राज्यस्तर :-प्रथम पुरस्कार २ कोटी, द्वितीय पुरस्कार १.५ कोटी, तृतीय पुरस्कार ७५ लक्ष रुपये



जिल्हा परिषदांना मिळणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप :

राज्यस्तर :प्रथमपुरस्कार५कोटी,द्वितीयपुरस्कार३कोटी,तृतीयपुरस्कार२कोटीरुपये

या अभियानांतर्गत विविध स्तरांवर संनियंत्रणासाठी ग्रामपंचायत ते राज्यस्तरीय समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. या अभियानाचे मुख्य घटक हे सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जस समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे, गावपातळीवर संस्था सक्षमीकरण करणे, उपजीविका विकास, सामाजिक न्याय, लोकसहभाग श्रमदानातून लोकचळवळ निर्माण करणे हे सात घटक असणार आहे. या अभियानांतर्गत प्राप्त झालेले मुल्यमापन प्रस्ताव समित्यांकडून तपासले जाणार आहे. मुल्यमापन प्रस्ताव हे १० जानेवारी २०२६ पर्यंत सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर ११ ते २६ जानेवारी दरम्यान तालुकास्तरीय मुल्यमापन, २८ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरीय मुल्यमापन, १७ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी दरम्यान विभागस्तरीय आणि संपूर्ण मार्च महिन्यात राज्यस्तरीय समितीकडून प्रस्तावांचे मुल्यमापन केले जाणार असून त्यानंतर पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागाकडून देण्यात आली आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया-जिल्हाध्यक्षपदी गणेश सोळंकी प्रदेश प्रतिनिधीपदी मयूर निकम

**जनसंचलन/बुलढाणा**

मराठी पत्रकार परिषद संलग्नित डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी टीव्ही ९ मराठी वृत्तवाहिनीचे पत्रकार गणेश सोळंकी तर, प्रदेश प्रतिनिधी म्हणून झी २४ तास चे प्रतिनिधी मयूर निकम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ आणि पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीत सिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली ८, सप्टेंबर रोजी ही निवड करण्यात आली आहे. पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषदेचा विस्तार राज्यभर होत आहे. बुलढाण्यातही पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून, पत्रकारांचा आवाजफ म्हणून ही संघटना नावारूपास आली आहे.



मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख तसेच डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याचे प्रमुख अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनात आणि प्रदेश उपाध्यक्ष अनिल उंबरकर, अमरावती विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांच्या नेतृत्वात उपरोक्त नियुक्त्या घोषित करण्यात आल्या. नियुक्ती झालेल्या मान्यवरांचा गौरव जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीत सिंग राजपूत, प्रदेश प्रतिनिधी नितीन शिरसाट, चिटणीस कासिम शेख, कार्याध्यक्ष वसीम शेख, प्रेमकुमार राठोड, सचिव शिवाजी मामनकर, डिजिटल मीडिया परिषदेचे विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ, जिल्हा सरचिटणीस दीपक मोरे, अभिषेक वरपे उपस्थितीत होते.




# डाक अदालत १०सप्टेंबरला

**जनसंचलन/बुलढाणा**

पोस्ट विभागाच्या तक्रारी सोडविण्यासाठी बुलडाणा डाकघर विभागातर्फे बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आले आहे. पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दल सहा आठवड्यात तक्रारींचे निवारण झालेले नसल्यास अशा तक्रारींची दखल डाक अदालतीमध्ये घेतल्या जाणार आहे.

देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये पोस्टाच्या सेवेने वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना संभाषण, पत्रव्यवहार किंवा सेवेमध्यील काही त्रुटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रारी होतात. तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवडा करण्यासाठी पोस्ट खात्यातर्फे डाक अदालती घेण्यात येते. विशेषतः टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तू पार्सल, बचत बँक आणि मनीऑर्डरबाबत तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. तक्रारीत तारीख आणि ज्या अधिकाऱ्यास मुळ तक्रार पाठविली त्याचे नाव आणि हुद्दा आदी संबधित माहिती डाक सेवेबाबत तक्रार डाकघर अधिक्षक गणेश आंभोरे, बुलडाणा विभाग, यांचे नावे दोन प्रतीत सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ पर्यंत पोहचेल, अशा रीतीने पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात १५ ते ३० सप्टेंबर दरम्यान गोवर-रुबेला विशेष लसीकरण मोहीम

**जनसंचलन/बुलढाणा**

आरोग्य विभागामार्फत राज्यातील सर्व आश्रमशाळांमध्ये गोवर व रुबेला प्रतिबंधात्मक विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने १५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांमधील पात्र विद्यार्थ्यांना गोवर व रुबेला लस दिली जाणार आहे. यासाठी आरोग्य अधिकारी व प्रशासनाची पूर्ण तयार झाली असून लसीकरणापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता संबंधितानी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे नुकतीच जिल्हा लसीकरण टास्क फोर्स समिती, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती तसेच पंतप्रधान जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्मान भारत कार्ड संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिराजदार, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, निवासी वैद्यकीय अधिकारी प्रवीण घोंगटे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, अल्पसंख्यांक विभाग, आदिवासी विभाग यांसह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळा व मदरशांमधील विद्यार्थ्यांच्या याद्या तयार करणे, आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती, प्रशिक्षण तसेच सूक्ष्म कृती आराखड्याचे नियोजन अशा विविध विषयाचा आढावा घेऊन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक तसेच नगरपालिका आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक ती तयारी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. या विशेष मोहिमेमुळे विद्यार्थ्यांना गोवर व रुबेला सारख्या गंभीर आजारांपासून संरक्षण मिळणार असून, राज्यातील मुलांचे आरोग्य सुदृढ व सुरक्षित होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८